# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १७/०५/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि.१७/०५/२०२२ रोजी सभा सुचना क्र. २ दि. १२/०५/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. राकेश शाह हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ४. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ५. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ६. | श्री. आनंद द. मांजरेकर | सदस्य |
| ७. | श्री. मनोज रा. दुबे | सदस्य |
| ८. | श्रीम. सुजाता य. पारधी | सदस्या |
| ९. | श्रीम. सिमा क. शाह | सदस्या |
| १०. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| १२. | श्रीम. अर्चना अ. कदम | सदस्या |
| १३. | श्रीम. कुसुम सं. गुप्ता | सदस्या |
| १४. | श्रीम. मर्लिन म. डिसा | सदस्या |
| १५. | श्री. अशरफ मो. शेख | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जयेश भानुदास भोईर | सदस्य |

मा. सभापती :-

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि.१७/०५/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 12, दि. 14/03/2022, व दि. 21/03/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

अशरफ शेख :-

आम्ही 2022-23 चे प्रभाग निधीचे सर्वांनी पत्र दिलेले होते. परंतू त्याच्यार काही निर्णय होत नाही. मला प्रशासनाला विचारायचे आहे की तुम्ही करणार आहेत की नाही.

शानु गोहिल :-

प्रशासनानी खुलासा करावा.

अशरफ शेख :-

प्रभाग निधी रिलीज करणार की नाही त्याचे उत्तर द्या. जोपर्यंत उत्तर देत नाही तोपर्यंत सभा तहकुब करावी.

शानु गोहिल :-

दि. 14/03/2022, व दि. 21/03/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 12 :-

दि. 14/03/2022, व दि. 21/03/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 12 :-

दि. 14/03/2022, व दि. 21/03/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. सभापती :-

अशरफ शेखचा जो प्रश्न आहे त्याचा खुलासा करावा.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

सन्मा. सभापती महोदय 2022-23 चे जे बजेट आहे त्या अनुषंगाने स्टॅन्डिंग रिकमेंडेशन केली होती त्याच्यानंतर महासभेमध्ये ठराव पारित झाला. परंतू ज्या एक्झाग्रेटेड ज्या फिगर आहेत अवास्तवव आहेत. त्याअनुषंगाने शासनाकडे पत्रव्यवहार करणार आहोत त्याचे मार्गदर्शन घेऊन कारवाई करु.

मा. सभापती :-

आयुक्त साहेब हे उत्तर बरोबर नाही. पत्रव्यवहार मध्येच चालू केला.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतूदीनुसार आयुक्तांचे जे अंदाज असतात त्या अंदाजाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केलेली आहे आणि महासभेनी जे अंदाज वर्तवले आहेत त्याला अंतिम करायचे किंवा नाही ह्याबाबत शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर पुढे कारवाई करु.

मा. सभापती :-

आयुक्त पुरा बजेट विखंडन को भेजता है| तो आयुक्त का बजेट निर्णय आनेतक चालू होता है आपने विखंडन के लिए भेजा नही और आपने बजेट चालू कर दिया तो आप विखंडन कर नही सकते आप मुझे बताओ कौनसे कायदे में लिखा है|

शानु गोहिल :-

महासभा का अंतिम निर्णय है|

मा. सभापती :-

और आपने ऑलरेडी बजेट चालू किया है|

शानु गोहिल :-

इकडे विखंडनचा विषयच नाही. ऑलरेडी इम्पलीमेंटेशन केले आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

विखंडनाची कारवाई सुरु आहे. आजच विखंडनाला पाठवणार आहोत.

शानु गोहिल :-

विखंडन का?

मा. अतिरिक्त आयुक्त :-

कारण आपण ज्या फिगर दिलेल्या आहेत त्या अवाजवी अवास्तव आहेत. वस्तुस्थितीला धरुन नाहीत त्यामुळे..................

मा. सभापती :-

आपको विखंडन को भेजना था तो आपको जब ठराव मिला उस दिन आप कारवाई कर सकते थे| आज उस बात को एक महिना हो गया और आपने बाकी सब बजेट चालू किया|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

नविन बजेटमध्ये बिलींग वगैरे करत नाही. जुन्या बजेटमधले स्पील ओव्हर वगैरे असतील..... चालू ह्याच्यात वेतन मानधन आणि मजूर ह्यासाठी आहे त्याकरीता आपण बांधील आहोत.

मा. सभापती :-

आयुक्त साहेब हे उत्तर बरोबर नाही. विखंडनचा कारवाई सुरु आहे हा काय जवाब आहे का?

हसमुख गेहलोत :-

कोणत्या विषयावर विखंडन पाठवले.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

आपण जे अंदाज वर्तवले होते तर त्या अंदाजाच्या अनुषंगाने जी वाढ आपण पकडतो ती वाढ न पकडता अवाजवी जी वाढ पकडली गेली अंदाज वर्तवले ते वस्तुस्थितीला धरुन नव्हते. त्यामुळे.......

हसमुख गेहलोत :-

तुम्ही महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता, स्थायी समिती सदस्य कोणाला विचारात घेतले का?

मा. सभापती :-

महासभेला पण तुम्ही सांगितले नाही की तुमचे बजेटचे फिगर बरोबर नाही. त्याच्यानंतर पण एक महासभा गेली.

हसमुख गेहलोत :-

अगर विखंडन के लिए भेजा है तो गैरकानुनी और मनमानी कारभार चालू है| ऐसा मनमानी कारभार चलता रहेगा तो किसी भी पदाधिकारी को विश्वास में न लेते हुए यह काम हुआ है तो हमारा इमसें आक्षेप है विरोध है| आज मुझे पता चला की विखंडन के लिए भेजा गया विना कारण किसी

पदाधिकारी को विश्वास में न लेते हुए यह उचित नही है यह मनमानी कारभार है| मेरा आक्षेप है और मेरा विराध भी है| प्रशासन क्या चाहती है कल माजी मुख्यमंत्रीने भी कहाँ की एक पैया आपका है और एक प्रशासन का है दोनो को मिलके साथ में चलना है| अगर आप मनमानी करोगे तो हम बर्दाश नही करेंगे|

मा. सभापती :-

तीन महिने के बाद इलेक्शन है| आत तक ऐसा कभी हुआ नही है| पहली बार ऐसा हुआ है|

मनोज दुबे :-

यह प्रशासन की मनमानी है|

जयंतीलाल पाटील :-

2020-21 चे अजून निघाले नाही.

सुरेश खंडेलवाल :-

परिस्थिती अशी आहे की महासभेचा अधिकार डावलून घेतला. स्टॅन्डिंगचा अधिकार आपण डावलतो आता मला असे वाटते तीन महिन्याअगोदर आपण रिझाइन देवून पालिका प्रशासन बसून टाका. महासभेत ठराव झाल्यानंतर आता बोलतात की विखंडीतला पाठवतो ते कसे चालेल.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

आपल्याकडून ठरावाची प्रत आली नाही त्याच्यामुळे नेमका काय ठराव केला आहे तो आमच्याकडे प्राप्त झाला त्यानंतर आम्ही कारवाई चालू केली.

मनोज दुबे :-

उपमहापौरजीने कहाँ वैसे आपने किसीको में लिया क्या?

मा. सभापती :-

सचिव साहेब आपण ठरावाची प्रत सर्व डिपार्टमेंटला केव्हा दिली?

हसमुख गेहलोत :-

सभापती महोदय आप पहले नक्की करीए प्रत दे दि थी इसके लिए खंडित के लिए भेजा था की उसके पहले टॅक्स में फर्क आया था उसके लिए खंडित को भेजा था| पहले आप नक्की करके ले ले| लोकप्रतिनिधी की दिशाभूल मत किजीए| यह मनमानी का कारभार चल रहा है|

सुरेश खंडेलवाल :-

विखंडीत के लिए क्या भेजा पूरा भेज दिया क्या? पुरा बजेट ही विखंडीत का भेजा है तो इसको किसी भी विभाग का इम्पलीमेंटेशन हो नही सकता| आपने कौनसे मुद्दे विखंडीत के लिए भेजे है? उसकी पुरी जानकारी दो| बजेट पास करके भेजा इतना मेहनत किया|

हसमुख गेहलोत :-

आपने कौनसे विषय को भेजा है बजेट के अंदर अगर जो भी 10 पॉइन्ट या 15 पॉइन्ट रह गया इस विषय पे बजेट बनाया तो किसी एक विषय को विखंडीत के लिए नही जाता बजेट पूरा का पूरा विखंडीत होता है| में आपको बता देना चाहूँगा और विखंडीत के लिए भेजते है तो जो भी पदाधिकारी है उनको सुचित किया जाता है बजेट के विषय में स्टॅन्डिंग के सदस्य का हक बनता है अंधेरे में रखके अपना कारोबार चला रहे है|

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती महोदय कई बार ऐसा हो गया की मुझे बताया गया की ठराव में 4 विषय में से दो ले लिया दो विखंडीत के लिए भेज दिया ऐसा पहले भी कईबार हुआ हे| बजेट विखंडीत के लिए भेजा है

तो कौनसा विषय भेजा है| हम तीन दिन चर्चा करते है तो हमको पता तो चले कि किस बात पे विखंडीत के लिए भेजा|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

आपण सांगता विश्वासात न घेता पाठवले आहे परंतु आपण जेव्हा पाठवतो त्याच्यानंतर शासन आपल्याला तुमचे म्हणणे काय ह्यासाठी विचारणा करते. त्यावेळेस तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता येईल. तुम्हाला विश्वासात घेतले तर तुम्ही कधीही म्हणणार नाही की पाठवा म्हणून त्यामुळे प्रशासनाला वाटते त्याप्रमाणे प्रशासन त्यापध्दतीने काम करते.

हसमुख गेहलोत :-

आम्हाला संधी तर दिली पाहिजे. सभापतींना सांगितले तर पाहिजे की आम्ही पाठवतो म्हणून.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

पाठवतो म्हणजे आजमितीस ते प्रोसेसमध्ये आहे. आज पाठवणार.

शर्मिला बगाजी :-

सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते हांगे साहेब आपल्याकडे कमिशनर होते बजेट नंतर काही अंशी भाग विखंडनाला पाठवला. त्याच्यातले काही विषय विखंडनाला पाठवले होते. विखंडनाचा अधिकार प्रशासनाला आहे. पण आपण विखंडनाला काय पाठवले ते आम्हाला माहित नाही त्याच्याबद्दल खुलासा केला पाहिजे. जरी तुम्ही सांगितले अवास्तव खर्च आहे ह्याच्याबद्दल मी सांगेन जेव्हा बजेटमध्ये होत होत जेव्हा बजेटमध्ये डिसकस होत होते तेव्हा आम्ही पण चर्चा केली. तुमच्याकडून महासभेत वेगळे प्रस्ताव सादर केले. महासभेमध्ये पण तोच विषय झालेला आणि त्याच्याबद्दल चर्चा झालेली होती. म्हणून काही अंशी प्रत्येक वेळेला मी प्रशासनाच्या बाजूने बोलत नाही पण त्यावेळेला आपल्याला माहित होते की आपण अवास्तव खर्चाबाबत कमिशनरने त्यावेळेला आपल्याला सांगितले होते की हा अवास्तव खर्च झालेला आहे. 400 कोटीचा एक्स्ट्रा आपण दिलेला आहे. जो प्रशासनाला झेपणारा नाही. त्याचवेळेला आपल्याला कमिशनरनी स्पष्ट दिलेले होते की असले अवास्तव खर्च आपल्याला परवडणारे नाहीत. सत्ताधारी म्हणून आपली पण अशी चूक आहे की कमिशनर बोलले की आपल्याकडून एक महिन्यानंतर ठराव गेला दीढ महिन्यांपूर्वी आम्ही ठरावाची कॉपी मागत होतो दिलीच नाही. किती वेळा आम्ही सचिवांना फोन केला अजून कॉपी आली नाही. आपल्याकडून एक महिना लेट झाला आता त्यांची प्रोसीजर चालू केली त्यांना तो अधिकार आहे त्याच्याबद्दल वाद नाही पण त्यांचा खुलासा स्पष्ट नसल्यामुळे सभागृहाची दिशाभूल होत आहे. ह्याच्यानंतर सत्ताधारी आणि विरोधक ह्यांची जुंपण्यापेक्षा प्रशासनाची भुमिका जोपर्यंत क्लियर होत नाही तोपर्यंत आम्ही वादच करणार आहोत. तुमचे राज्यशासनाकडून येईपर्यंत आमची टर्म संपलेली असेल आता जे सभापतींनी सांगितले काही बिल कोणाच्या दबावाखाली किंवा काही गोष्टी प्रशासनाकडून होणे गरजेचे आहे त्या प्रोसेस तुम्ही चालू केलेल्या आहेत. आणि एका ठिकाणी विखंडनसाठी पाठवलेले आहे ते दूजाभाव दिसतो म्हणजे नक्की बजेट नसेल तर पुढची प्रोसेस काय करणार, तुम्ही विखंडनाला काय पाठवले आणि सध्या तुमची प्रशासक म्हणून काय काम चालू आहेत त्याच्याबद्दल खुलासा करा.

हसमुख गेहलोत :-

हम जो भी काम करते है वो निधी के माध्यम से करते है| बजेट पे आक्षेप आया है तो कही न कही लोकप्रतिनिधी पे आक्षेप आता है और हम लोगो के हित के लिए काम करते है| यहाँ पे दो स्टेटमेंट आ रहे है पहले इन्होंने कहाँ भेज दिया अभी कहाँ प्रोसेस में है| बार बार दिशाभूल हो रही है| और यह अच्छी बात नही है अगर अच्छा विकास कार्य करना है तो यह अच्छी बात नही है| बहुत सारे काम शहर के हित के लिए है और बहुत सारे विषय हमने बजेट में डाले है| विषय बजेट काही है हक इनका है इस बात को डिनाय नही करना है लेकिब कब जब पुरी तरह से गलत हुआ है यह इतिहास हर बार दौरा रहा

है ऐसा नही है यह पहली बार घट रहा है| कमिशनर को यह बात पदाधिकारी के सामने या स्थायी समिती के सामने बात रखते थे खुलासा करते थे डिसकस करते थे|

शानु गोहिल :-

मनमानी कारोबार चालू है|

मा. सभापती :-

आज आयुक्त साहब नही है इस विषय में कल आयुक्त् साहब का समय लेते है और उनके साथ मिटींग करते है उसके बाद आगे का विषय लेते है|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

जेव्हा त्यांनी म्हटले की तुम्ही बजेटचा खर्च चालू केलेला आहे तर विखंडनाला पाठवल्यावर कसे काय चालू केले त्याची प्रोसेस चालू आहे.

हसमुख गेहलोत :-

मी ज्यावेळी आलो त्यावेळी मी ऐकले की तुम्ही विखंडनाला पाठवले. मी तुम्हाला विचारले तर तुम्ही बोलले पाठवले. सन्मा. सदस्य खंडेलवालजीने स्पष्टीकरण मागितले आणि मर्लिन मॅडम बोलल्यावर तुम्ही बोलले की आम्ही प्रोसेसमध्ये टाकले. आम्ही काय बोलले नाही तुमचे दोन विषय घडले आहेत. आम्ही चुकीचे बोलले नाही. सध्या विषय असा आहे की प्रोसेसमध्ये आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

हो प्रोसेसमध्ये आहे.

सुरेश खंडेलवाल :-

प्रोसेस किती दिवस चालणार काय होणार?

शानु गोहिल :-

प्रोसेस चालू होने के बावजूद भी महिला बाल कल्याण का टेंडर निकल रहा है| नाले सफाई हो रहा है| क्यों हो रहा है?

मा. सभापती :-

आयुक्त से टाईम लेके मिलते है बाद में आगे का प्रोसीजर करते है| सभा तहकुब करते है|

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दु. 12.20 वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका